महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रमामध्ये
नवीन योजनांचा समावेश करण्याबाबत

# महाराष्ट्र शासन

## नियोजन विभाग

## शासन निर्णय क्रमांकः माविका-२०१३/प्र.क्र. ०४/का.१४१८

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

तारीख: २४ जुलै, २०१३

वाचा —

१) **शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक: माविमि-२०१०/प्र.क्र.८१/ का-१४१८, दि.१९ जुलै, २०११**

२) **शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक: माविका-२०१२/प्र.क्र.६९/ का-१४१८, दि.१२ जुलै, २०१२**

प्रस्तावना —

राज्यातील मानव विकास कार्यक्रमाची व्याप्ती १२ जिल्ह्यांतील २५ तालुक्यांवरुन वाढवून सदर कार्यक्रम सन २०११-१२ पासून ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली या २२ जिल्हयांतील १२५ तालुक्यांमध्ये राबविण्याचा निर्णय शासनाने संदर्भांकित क्र.(१) अन्वये घेतला आहे. सदर कार्यक्रम निवडलेल्या तालुक्यांतील ग्रामिण भागात तसेच 'क' वर्ग नगरपालिका क्षेत्रात राबविण्यात येत आहे. सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे व्हावी तसेच कार्यक्रमाचा लाभ अधिकाधिक लोकांना मिळावा या दृष्टिकोनातून सदर कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

## शासन निर्णय—

२. मानव विकास कार्यक्रमांतर्गत सध्या राबविण्यात येत असलेल्या योजनांव्यतिरिक्त खालील दोन योजनांचा नव्याने समावेश करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे:-

१) अंगणवाडीसाठी नवीन इमारतीचे बांधकाम करणे

२) आरोग्य उपकेंद्राच्या नवीन इमारतीचे बांधकाम करणे

याशिवाय संदर्भ क्र. (१) येथील शासननिर्णयान्वये राबविण्यात येत असलेल्या "तालुक्यातील मोठ्या गावांमध्ये अभ्यासिका सुरु करणे" या योजनेच्या निकषांमध्ये बदल करण्यात येत असून, सदर योजना "तालुक्यातील 'क' वर्ग नगरपालिका आणि मोठ्या गावांमध्ये अभ्यासिका सुरु करणे" अशी सुधारित करण्यात येत आहे. सदर योजनांचे सविस्तर निकष परिशिष्ट 'अ' मध्ये देण्यात आले आहेत.

३. त्याचप्रमाणे, मानव विकास कार्यक्रमांतर्गत सध्या राबविण्यात येत असलेल्या "किशोरवयीन मुलींना आरोग्य विषयक बाबी व व्यवसाय कौशल्य विकसित करण्याबाबत प्रशिक्षण देणे" या योजनेअंतर्गत निवड करण्यात येणाऱ्या प्रेरीकांना जे प्रशिक्षण देण्यात येते, त्यामध्ये "पोषण व आहार" या विषयाबाबतच्या प्रशिक्षणाचाही समावेश करण्यात येत आहे. जेणेकरुन, त्या गावातील लाभार्थी महिलांना सदर विषयाबाबतचे समुपदेशन करु शकतील. सदर "पोषण व आहार" संबंधीची तपशीलवार माहिती महिला व बाल विकास विभागाकडून उपलब्ध करुन देण्यात येईल.

४. मानव विकास कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्याच्या दृष्टीने संदर्भ क्र. (२) येथील दि. १२ जुलै, २०१२ च्या शासननिर्णयान्वये, मानव विकास कार्यक्रमांतर्गत तालुक्यास प्राप्त होणाऱ्या एकूण निधीपैकी १० टक्के निधीतून जिल्हा मानव विकास समितीच्या मान्यतेने मानव विकास निर्देशांक उंचाविण्यासंबंधीच्या नाविण्यपूर्ण योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. तथापि, सदर नाविण्यपूर्ण योजनांऐवजी जिल्हा आणि तालुका स्पेसिफिक योजना मानव विकास कार्यक्रमात राबविण्याचा निर्णय या शासन निर्णयान्वये घेण्यात येत आहे. मानव विकास कार्यक्रमाअंतर्गत तालुक्यासाठी मिळणाऱ्या एकूण निधीच्या २० टक्के निधी जिल्हा / तालुका स्पेसिफिक योजनांवरच खर्च करण्यात यावा.

५. जिल्हा/तालुक्यांची भौगोलिक, आर्थिक तसेच सामाजिक परिस्थिती विचारांत घेऊन, जिल्हाधिकारी यांनी जिल्हा/तालुका स्पेसिफिक योजना तयार कराव्यात आणि दरवर्षी ३० जूनपर्यंत योजनानिहाय तपशीलवार कार्यक्रम तयार करून, सदरचा प्रस्ताव आयुक्त (मानव विकास), मानव विकास आयुक्तालय यांच्याकडे मान्यतेस्तव सादर करावा. आयुक्त, मानव विकास यांची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी. सध्या राबविण्यात येत असलेल्या नाविण्यपूर्ण योजनांचा समावेशही या जिल्हा/तालुका स्पेसिफिक योजनांमध्ये करण्यात येत आहे.

६. तसेच, संदर्भ क्र. (१) येथील शासननिर्णयामध्ये नमूद करण्यात आलेल्या खालील दोन योजना, त्यांना पुरेसा वाव नसल्याने रद्द करण्यात येत आहेत:-

१. रेषीम कोश विकसित करण्याकरीता कीटक संगोपनगृह बांधणे.

२. स्वयंसहायता बचत गटाच्या माध्यमातून परसबाग/किचनगार्डन योजना राबविणे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०७२४१२४०३३५०१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

JAGTAP ASHOK K

Digitally signed by JAGTAP ASHOK K
DN: c=IN, o=Goverment of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=JAGTAP ASHOK K
Date: 2013.07.26 17:13:05 +05'30'

**(अ.कृ. जगताप)**

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालंचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४. मा. मंत्री/राज्यमंत्री , यांचे खाजगी सचिव,
५. मा.कार्यकारी अध्यक्ष, राज्य नियोजन मंडळ, नवीन प्रशासकीय भवन, १८ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई-३२
६. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
७. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
८. महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
९. महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
१०. शासनाचे मुख्य सचिव,
११. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
१२. महासंचालक, यशदा, पुणे
१३. सदस्यसचिव, उर्वरीत वैधानिक विकास मंडळ, नवीन प्रशासकीय भवन, १८वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई-३२
१४. सदस्यसचिव, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, नवीन प्रशासकीय इमारत, तळ मजला, औरंगाबाद

१५. सदस्यसचिव, विदर्भ वैधानिक विकास मंडळ, B-२३/१, साऊथ अंबाजरी मार्ग, अंध विद्यालयाजवळ, नागपूर
१६. आयुक्त, मानव विकास आयुक्तालय, बाबा पेट्रोलपंपजवळ, अदालत रोड, औरंगाबाद
१७. विभागीय आयुक्त, (सर्व)
१८. जिल्हाधिकारी, (सर्व)
१९. मुख्य कार्यकारी अधिकारी,(सर्व)
२०. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय
२१. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र शासन, मुंबई.
२२. अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र शासन, मुंबई.
२३. उपायुक्त, नियोजन, विभागीय आयुक्त कार्यालय, (सर्व)
२४. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)
२५. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, (सर्व)
२६. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
२७. संचालक, शिक्षण संचालनालय, पुणे
२८. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, मुंबई
२९. आयुक्त, कृषी आयुक्तालय, पुणे
३०. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, (सर्व)
३१. जिल्हा कोषागार अधिकारी, (सर्व)
३२. मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, (सर्व)
३३. नियोजन विभागातील सर्व सह सचिव/उपसचिव
३४. निवड नस्ती (का.१४१८), नियोजन विभाग

## परिशिष्ट १

## योजना क्रमांक (एक)

**योजनेचे नांव: अंगणवाडी इमारतीचे नवीन बांधकाम करणे**

**योजनेची व्याप्ती:**

मानव विकास कार्यक्रमात समाविष्ट १२५ तालुक्यांमध्ये अंदाजे २०,००० अंगणवाड्या कार्यरत आहेत. या शिवाय दरवर्षी काही अंगणवाड्या नव्याने मंजूर केल्या जातात. सद्यस्थितीत मानव विकास कार्यक्रमात समाविष्ट १२५ तालुक्यामध्ये अंदाजे ५,००० अंगणवाड्याकरिता स्वतंत्र इमारत नाहीत.

ही बाब विचारांत घेऊन, मानव विकास कार्यक्रमांतर्गत समाविष्ट प्रत्येक तालुक्यामध्ये ११ ठिकाणी अंगणवाडी इमारतीचे बंधकाम हाती घेण्यात यावे. अशा प्रकारे १२५ तालुक्यामध्ये १,३७५ अंगणवाडी इमारतींचे बांधकाम करण्यात यावे.

**योजनेवरील अपेक्षीत खर्च :**

राज्य शासनाच्या महिला व बालकल्याण विभागाने तयार केलेल्या टाईप डिझाईननुसार प्रत्येक अंगणवाडी इमारतीच्या बांधकामावर अंदाजे रु.४.५० लक्ष खर्च अपेक्षित आहे. अशाप्रकारे १३७५ अंगणवाडी इमारतीच्या बांधकामाकरिता अंदाजे रु. ६१८८ लक्ष खर्च होईल अपेक्षित आहे.

**कार्यान्वयीन यंत्रणा:**

ही योजना राज्य शासनाच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत आणि जिल्हा पातळीवर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या जिल्हा समितीच्या नियंत्रणाखाली राबविली जाईल. अंगणवाडीचे बांधकाम पारंपारिक पद्धतीने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्याऐवजी या करिता, जिल्हास्तरावरून टेंडर प्रसिध्द करून निविदा मागविल्या जातील. योग्य निविदेची निवड जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या तज्ञ समितीकडून करण्यात यावी. सदर समितीमध्ये जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालविकास), जिल्हा परिषद, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (जिल्हा परिषद), जिल्हा नियोजन अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांनी निमंत्रित केलेले इतर अधिकारी असतील.

**योजना रावविण्याचा कालावधी:**

ही संपूर्ण योजना साधारणत: ९ महिन्याच्या कालावधीत राबविली जाईल.

**योजनेचे मुल्यमापन :**

अंगणवाडी इमारतींचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर पुढील ६ महिन्यांच्या आंत या योजनेचे मुल्यमापन करण्यात येईल. हे मुल्यमापन शक्यतो, यशदा, पुणे या प्रशिक्षण संस्थेमार्फत किंवा इतर सक्षम खाजगी सेवाभावी संस्थेमार्फत करण्यात येईल.

**<u>योजना क्रमांक (दोन)</u>**

**<u>योजनेचे नांव:</u> आरोग्य उपकेंद्राच्या नवीन इमारतीचे बांधकाम करणे**

**योजनेची व्याप्ती:**

प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत साधारणत: ४ ते ५ उपकेंद्र आहेत. अशा प्रकारे प्रत्येक तालुक्यात साधारणत: २० ते २५ आरोग्य उपकेंद्र आहेत. मानव विकास कार्यक्रमात समाविष्ट १२५ तालुक्यांमध्ये अंदाजे ३००० उपकेंद्र कार्यरत आहेत. यापैकी अनेक आरोग्य उपकेंद्रांना स्वतंत्र इमारती नाहीत. ही बाब विचारात घेऊन, मानव विकास कार्यक्रमात समाविष्ट प्रत्येक तालूक्यात ३ आरोग्य उपकेंद्राच्या इमारतींचे बांधकाम करण्यात यावे. अशा प्रकारे १२५ तालुक्यामध्ये ३७५ इमारतींचे बांधकाम करण्यात येईल.

**योजना राबविण्याकरिता अपेक्षीत खर्च :**

राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने तयार केलेल्या टाईप / डिझाईननुसार प्रत्येक आरोग्य उपकेंद्राच्या इमारत बांधकामाकरिता अंदाजे रु.२५ लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. ही बाब विचारात घेता ३७५ इमारतींच्या बांधकामाकरिता अंदाजे रु. ९३७५ लक्ष खर्च अपेक्षित आहे.

**<u>कार्यान्वयीन यंत्रणा:</u>**

ही योजना राज्य शासनाच्या आरोग्य विभागामार्फत आणि जिल्हा पातळीवर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या जिल्हा समितीच्या नियंत्रणाखाली राबविली जाईल. आरोग्य उपकेंद्राचे बांधकाम पारंपारिक पद्धतीने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्याऐवजी या करिता, जिल्हास्तरावरून टेंडर प्रसिध्द करून निविदा मागविल्या जातील. योग्य निविदेची निवड जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या तज्ञ समितीकडून करण्यात यावी. सदर समितीमध्ये जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), जिल्हा आरोग्य अधिकारी, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा नियोजन अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांनी निमंत्रित केलेले इतर अधिकारी असतील.

**योजना रावविण्याचा कालावधी:**

ही संपूर्ण योजना साधारणत: ९ महिन्याच्या कालावधीत राबविली जाईल अशी अपेक्षा आहे. या करिता जिल्हा पातळीवरून सर्व कामांचे एकत्रित टेंडर काढून निविदा मागविल्या जातील. तसेच जिल्हाधिकाऱ्यांनी गठीत केलेल्या समितीकडून योग्य निविदेची निवड केली जाईल.

**योजनेचे मुल्यमापन :**

सर्व इमारतींचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर त्यापुढील ६ महिन्यांच्या कालावधीत या योजनेचे मुल्यमापन करण्यात येईल. योजनेचे मुल्यमापन यशदा, पुणे या प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून किंवा इतर सक्षम खाजगी सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून केले जाईल. मुल्यामापनाचा कार्यक्रम मानव विकास आयुक्तातयातर्फे राबविला जाईल.

<u>योजना क्रमांक (तीन)</u>

**<u>योजनेचे नांव:</u> "क" वर्ग नगरपालिका आणि मोठ्या गावांमध्ये अभ्यासिका स्थापन करणे बाबत.**

**योजनेची व्याप्ती:**

मानव विकास कार्यक्रमात समाविष्ट १२५ तालुक्यांमधील प्रत्येक तालुक्यात अंदाजे ३० माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळा आहेत. अशाप्रकारे मानव विकास कार्यक्रमात समाविष्ट १२५ तालुक्यांमध्ये अंदाजे ३,०७७ माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळा आहेत यापैकी बहूतेक शाळांमध्ये स्वतंत्र अभ्यासिका नाहीत. ग्रामीण भागातील निवासी घरे फार छोटी असतात. तसेच तेथे अभ्यासाकरिता पोषक वातावरण सुध्दा नसते. हीच परिस्थिती "क" वर्ग नगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टी व गरीब वसाहतीमधील आहे. लोड शेडींगची समस्यासुध्दा अजूनही पूर्णत: संपूष्टात आलेली नाही.

ही परिस्थिती विचारात घेता, प्रत्येक मोठ्या गावामध्ये आणि "क" वर्ग नगरपालिका कार्यक्षेत्रात सध्या अस्तित्वात असलेल्या माध्यमिक /उच्च माध्यमिक शाळांमध्ये इयत्ता ८ वी ते इयत्ता १२ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सोयीकरिता अभ्यासिका सुरू करण्यात याव्यात. अशा प्रकारच्या अभ्यासिका सुरू करण्याकरिता वेगळ्या इमारतींचे बांधकाम करण्यात येणार नाही. माध्यमिक /उच्च माध्यमिक शाळांतील खोल्यांचा वापर अभ्यासिका सुरू करण्याकरिता करण्यात यावा. या अभ्यासिकांवर नियंत्रण संबंधित माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळांचे राहील.

प्रत्येक तालुक्यांमध्ये २५ अभ्यासिका याप्रमाणे १२५ तालुक्यामध्ये ३,१२५ अभ्यासिका सुरू करण्यात याव्यात.

**योजना राबविण्याकरिता अपेक्षीत खर्च :**प्रत्येक अभ्यासिकेकरिता अंदाजे रु. १ लक्ष खर्च अपेक्षितआहे. या खर्चाची विगतवारी खालीलप्रमाणे असेल:-

| | | |
|---|---|---|
| अ) | पुस्तकांची खरेदी | = रु. ३० हजार |
| ब) | पुस्तके ठेवण्याकरिता कपाटे रॅक इ., | = रु. १५ हजार |
| क) | सोलार लाईटची व्यवस्था किंवा इन्व्हर्टर ची व्यवस्था | = रु. ३० हजार |
| ड) | व्यवस्थापक व सेवकाच्या मानधनावरील खर्च | = रु. १० हजार |
| इ) | अतिरिक्त पुस्तके (MPSC/UPSC अभ्यासक्रमाची) | = रु. १० हजार |
| फ) | इतर किरकाळ खर्च | = रु. ५ हजार |
| | **एकुण** | **= रु. १ लक्ष** |

वर नमुद केल्याप्रमाणे ३१२५ अभ्यासिका सुरू करण्यकरिता अंदाजे रु. ३,१२५ लक्ष खर्च अपेक्षित आहे.

**अभ्यासिकेचे व्यवस्थापन:**

या योजनेअंतर्गत सुरू करण्यात आलेल्या सर्व अभ्यासिकांचे व्यवस्थापन संबंधित माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळांमार्फतच केले जाईल. अभ्यासिकांसाठी कुठल्याही प्रकारचा आवर्ती (रिकरींग) किंवा महसूली खर्च या कार्यक्रमांतर्गत अनुज्ञेय राहणार नाही.

**कार्यान्वयीन यंत्रणा:**

ही योजना राज्य शासनाच्या माध्यमिक शिक्षण विभागामार्फत आणि जिल्हा पातळीवर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षेतेखाली गठित करण्यात आलेल्या जिल्हा मानव विकास समितीच्या नियंत्रणाखाली राबविली जाईल.

**योजनेचे मुल्यमापन :**

या योजनेचे मुल्यमापन करण्यात येईल. साधारणत: हे मुल्यमापन जानेवारी ते मार्च या तीन महिन्यांच्या कालावधीत पूर्ण केले जाईल. हे मुल्यमापन यशदा, पुणे या प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून किंवा इतर सक्षम खाजगी सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून केले जाईल. मूल्यमापनाचा कार्यक्रम मानव विकास आयुक्तालयातर्फे राबविला जाईल.